# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

'इंद्रभुवन' डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर -413001

( सामान्य प्रशासन विभाग, ईमेल :- smcgados2@gmail.com )

जा.क्र.सआस/कक्ष-1/आस्था-1/429 दिनांक.05 /03 /2026

**(जाहीर ई-निविदा सुचना)**

सोलापूर महानगरपालिकेच्या विविध विभागाकरिता आवश्यक कुशल, अकुशल व अर्धकुशल मनुष्यबळाचा पुरवठा करणेकामी किमान सेवा शुल्क दराने पॅनेल निश्चित करण्यासाठी खालीलप्रमाणे ई-निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | कामाची मुदत | इसारा रक्कम | सुरक्षा रक्कम | निविदा फी |
|---|---|---|---|---|---|
| १ | सोलापूर महानगरपालिकेच्या विविध विभागाकरिता आवश्यक कुशल, अकुशल व अर्धकुशल मनुष्यबळाचा पुरवठा करण्याबाबत (संख्या विविध विभागाचे आवश्यकतेनुसार निश्चित करण्यात येईल.) | ३ वर्षे | १,५०,०००/- | १,५०,०००/- | ३०००+GST |

**ई-निविदा प्रसिध्दी तपशिल**

| | |
|---|---|
| १. ई-निविदा प्रसिध्दी | दि.०६/०३/२०२६ सकाळी ११.०० वाजले पासुन |
| २. ई-निविदा ऑनलाईन विक्री व सादर दिनांक | दि.०६/०३/२०२६ सकाळी ११.०० वाजले पासुन ते दि१३ /०३/२०२६ सायं. ६.०० वाजेपर्यंत |
| ३. अनामत रक्कम भरणा व निविदा प्रपत्र भरणा | दि.१३ /०३/२०२६ दुपारी ३.०० वाजेपर्यंत |
| ४. ऑनलाईन निविदा उघडणे | दि.१६ /०३/२०२६ वेळ दुपारी ११.०० वाजता (शक्य झाल्यास) |

इतर शर्ती व अटी www.mahatender.gov.in व www.solapurcorporation.gov.in या संकेत स्थळावर ई-निविदा नमुन्या मध्ये पहावयास मिळेल. अनामत रक्कम व निविदा प्रपत्र फी ऑनलाईन भरण्यात यावी.

(डॉ.सचिन ओम्बासे, भा.प्र.से)

**आयुक्त,**

**सोलापूर महानगरपालिका,सोलापूर**

Scanned with OKEN Scanner

# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

'इंद्रभुवन'डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर -413001
( सामान्य प्रशासन विभाग, ईमेल :- smcgados2@gmail.com )

जा.क्र.सआस/कक्ष-1/आस्था-1/430 दिनांक. 05/03/2026

## निविदेच्या अटी व शर्ती

1. महाराष्ट्र शासनाच्या http:/www.mahatenders.gow.in या संकेतस्थळावर सविस्तर निविदा पहावयास मिळेल.

2. उपरोक्त निविदा ह्या दोन लिफाफा म्हणजेच पहिल्या लिफाफामध्ये कागदपत्रे व दुसऱ्या लिफाफा मध्ये दरपत्रक सादर करणे आवश्यक आहे. पहिला लिफाफा हा (तांत्रिक लिफाफा) असून सदर लिफाफा मध्ये पुरवठादार संस्थेची आवश्यक कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. सदर लिफाफा मध्ये काही त्रुटी आढळल्यास संबंधीत मक्तेदाराचे दर पत्रक लिफाफा उघडण्यात येणार नाही. याची संबंधित पुरवठादारांनी नोंद घ्यावी.

3. तांत्रिक लिफाफ्यात सादर करावयाची कागदपत्रे :-
   1.पॅन कार्ड
   2. नोंदणी प्रमाणपत्र
   3.मागील तीन वर्षाचे आयकर विवरणपत्र
   4. वार्षिक उलाढल
   5. ई एस आय सी नोंदणी प्रमाणपत्र
   6. पी एफ नोंदणी प्रमाणपत्र
   7. सोलापूर महानगरपालिका मध्ये पदाधिकारी/ अधिकारी/ कर्मचारी म्हणून जवळचे नातेवाईककाम करत नसलेचे प्रमाणपत्र
   8. प्रोफेशनल टॅक्स नोंदणी प्रमाणपत्र

4. कामगार कल्याण आयुक्त यांच्याकडे मजुर पुरवठा करण्याबाबतचे (Labour Licence) नोंदणी केलेले प्रमाणपत्र,. ऑनलाईन अपलोड करणे बंधनकारक राहील.

5. G.S.T नोंदणी प्रमाणपत्र व लगतच्या महिन्यातील G.S.T रिटर्न भरलेली प्रत टेंडर सादर करतेवेळी ऑनलाईन अपलोड करणे बंधनकारक राहील.

6. बयाणा रक्कम ऑनलाईनद्वारे भरणा करावा .

7.सुरक्षा रक्कम तसेच अतिरिक्त अनामत रक्कम करारपत्र करताना जमा करावी लागेल, या रक्कमांवर व्याज अथवा मोबदला दिला जाणार नाही. कामगारांची वेतन विषयक कोणतीही तक्रार उदभवल्यास सदरची अतिरिक्त अनामत जमा रक्कम जप्त करुन कामगारांचे वेतन विषयक अडचणी सोलापूर महानगरपालिका सोडवेल, सर्व रक्कम कामाची मुदत पुर्ण झालेवर सहा महिन्यांनी अर्ज करुन परत मागणी करावयाची आहे.

8. मंजुर निविदाधारकास योग्य त्या स्टॅपवर करारपत्र व प्रतिज्ञापत्र लिहून द्यावे लागेल. सदरप्रमाणे तजविज न झाल्यास बयाणा/सुरक्षा अनामत रक्कम जप्त करुन निविदा रद्द करण्यात येईल.

सोलापूर

Scanned with OKEN Scanner

9. ठेकेदारामार्फत/ कंत्राटदारामार्फत/मक्तेदारामार्फत घेण्यात आलेल्या कंत्राटी कामगारांचे वर्गवारीप्रमाणे (कुशल, अर्धकुशल व अकुशल) कायद्यानुसार शासनाच्या प्रचलित धोरणानुसार निश्चित करणेत आलेल्या मुळ किमान वेतन दराने वेतन प्रदान करणे बंधनकारक राहील.

10. प्रशिक्षित शारिरीकदृष्ट्या सक्षम आणि आवश्यक कागदपत्रे असलेले कर्मचारी देणे बंधनकारक राहील.

11. ओळखपत्रे, युनिफॉर्म, आणि आवश्यक सुरक्षासाधने उपलब्ध करणे (ज्या कामांसाठी आवश्यक) बंधनकारक राहील.

12. करारातील सेवेत त्रुटी आढळल्यास मंजूर मक्तेदारावर दंड आकारण्यात येईल.

13. कंत्राटदाराने सर्व कामगारांचा वैयक्तीक अपघात व आरोग्य विमा करणे आवश्यक राहील.

14. कोणत्याही घटनेची / अपघाताची जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

15. मासिक वेतन थेट कामगारांच्या बँक खात्यात जमा करणे बंधनकारक आहे.

16. कर्मचारी अनुपस्थितीमध्ये तात्काळ पर्याय उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

17. सर्व प्रकारचे वाहनांचे चालक बाबत ज्या त्या वाहनाप्रमाणे ड्रायव्हिंग लायसन्स (Valid) वाहनचालकाकडे असणे आवश्यक आहे, याची खात्री करणे बंधनकारक राहील. तसेच वाहन चालकाला वाहन चालविणेबाबतचा अनुभव असणे आवश्यक आहे.

18. मनपाचे वाहनाचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई देण्याची जबाबदारी मक्तेदार यांची राहील.

19. भविष्य निर्वाह निधीची रक्कम भरल्याबाबतचा स्वतंत्र दाखला, चलने, मासिक हजेरीपत्रक, वार्षिक विवरण पत्र, इसीआरची प्रत, leave with wages, paid holiday किमान वेतन कायदा, १९६३ नियम २७ नुसार वेजेस रजिस्टर ठेवण्यात यावे व त्याची प्रति बिलासोबत जोडण्यात याव्यात. तसेच कंत्राटी कामगारांचे वेतन अदा केलेले मागील महिन्याचे पगार पत्रक बिलासोबत जोडणे बंधनकारक राहील, याबाबतची सर्व कागदपत्रे सादर करणे ठेकेदारास बंधनकारक राहील. तदनंतर प्राप्त कागदपत्रांची पड़ताळणी करुन त्याची खात्री झाल्यानंतर पूढील महिन्याचे देयके अदा करण्यात येतील.

20. ठेकेदारांकडून किमान वेतन व भविष्य निर्वाह कायदयातील तरतुदीची पुर्तता करणे बंधनकारक राहील. किमान वेतन व भविष्य निर्वाह कायदयातील तरतुदी पूर्ण केले बाबतची कागदपत्रे सादर केल्यानंतरच बिल / देयके मंजुर / अदा करण्यात येईल.

21. ठेकेदार /कंत्राटदार/ मक्तेदारांनी कंत्राटी कामगारांना शासकीय नियमानुसार देय असलेल्या आरोग्य व कल्याणासंबंधीच्या सुविधा देणे बंधनकारक राहील.

22. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्वच निविदा नाकारण्याचा किंवा स्वीकारण्याचा अधिकार मा.आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांनी राखून ठेवलेला आहे.

23. निविदेत काही अडचणी असल्यास कार्यालयीन वेळेत सामान्य प्रशासन विभाग, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर येथे संपर्क साधावा.....

Scanned with OKEN Scanner

24. निविदा धारकांनी दर पत्रकामध्ये फक्त सेवा शुल्क नमूद करावयाचे आहेत. मा. केंद्र व राज्य शासनाच्या प्रचलित धोरणानुसार सेवा शुल्क़दर किमान 3.85% व कमाल सेवा शुल्क दर 7% इतका असावा. 3.85% पेक्षा कमी व 7% पेक्षा जास्त सेवा शुल्क दर भरणाऱ्या निविदांचा विचार केला जाणार नाही. (लागू असलेले कर अतिरीक्त राहतील.)

25. पुरवठा करण्यात येणारे कामगार वय किमान १८ वर्ष व कमाल ४५ वर्षापर्यंत असेल, तसेच परवठा करणेत आलेले कामगार हे शारिरिकदृष्ट्या काम करणेस सक्षम असले पाहिजेत.

26. निविदेत निविदा धारकांनी कुशल, अर्धकुशल व अकुशल या प्रमाणे प्रति कामगार सेवा शुल्क दर नमूद करावयाचा आहे.

27. मक्ता दिल्यानंतर त्याची ठरलेली मुदत संपुष्टात येईपर्यंत काम करणे संबंधित संस्था / ठेकेदाराला बंधनकारक राहील. चालू परिस्थिती मधून काम बंद केल्यास बयाणा व सुरक्षित रक्कम जप्त करण्यात येईल. म.न.पा.स कराराच्या मुदतीपर्यंत पर्यायी व्यवस्था करावी लागल्यास त्याची भरपाई संबंधितसंस्था/ठेकेदाराने म.न. पा. स करणे बंधनकारक राहील.

28. सदर मक्त्याचा कालावधी 3 वर्षे इतका राहील.

29. मक्तेदाराने प्रत्येक महिन्याचे invoice EPF व ESI चलनासह सादर करणे आवश्यक राहील.

30. निविदाधारक हे काळया यादीमध्ये (Black List) समाविष्ठ नसलेबाबत self declaration प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

31. कंत्राटी कामगार सेवा (विनियमन व उच्चाटन) अधिनियम, 1970 व महाराष्ट्र कंत्राटी कामगार नियम 1971 मधील लागू असलेल्या सर्व तरतूदीची पूर्तता करुन व सोलापूर महानगरपालिका आदेश करेल त्याप्रमाणे तरतूदीनुसार वेळोवेळी महानगरपालिकाकडे अहवाल सादर करावा.

(डॉ.सचिन ओम्बासे, भा.प्र.से)
**आयुक्त,**
**सोलापूर महानगरपालिका,सोलापूर**

Scanned with OKEN Scanner